**प्रेस नोट ता.०५/०६/२०१९**

# कोंढवा पोलीस ठाणे पुणे शहर

## कोतवाली पोलीस ठाणे अहमदनगर येथे खुनाचे प्रयत्न करून पसार झालेल्या आरोपींना कोंढवा पोलीसांनी केले जेरबंद

कोतवाली पोलीस ठाणे, अहमदनगर गु.र.नं.५८१/२०१९ भादंविसं क.३०७,३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. दाखल गुन्हयातील जखमी नामे किरण जगताप वय-२०वर्षे, रा.अहमदनगर यांस जिवे मारण्याचे उध्देशाने गंभीर जखमी करून घटनास्थळावरून आरोपी पसार झाले होते.

दाखल गुन्हयातील पसार झालेला आरोपीत नामे १.फैजान अब्दुल रौफ शेख वय-२६ वर्षे, रा. जुना बाजार, भिस्त गल्ली, अहमदनगर २. अशरफ अब्दुल रौफ वय-२४ वर्षे रा. सदर ३. अबीद कलीम शेख वय-२८ वर्षे, रा. जुना बाजार बंगाल चौकी अहमदनगर हे गुन्हा करून कोंढवा परिसरामध्ये आल्याची बातमी कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक एस.व्ही.खामगळ यांना मिळाल्याने ते स्वतः व त्यांचेकडील स्टाफसह आरोपीचे शोध घेणेकरीता कोंढवा पोलीस ठाणेकडील पोलीस मदत घेणेकामी आले होते.

कोंढवा पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. अनिल पाटील, शहर यांनी पोलीस उपनिरीक्षक एस.व्ही.खामगळ, कोतवाली पोलीस ठाणे अहमदनगर यांचेकडून दाखल गुन्हयाची हकिकत समजावून घेवून कोंढवा पोलीस ठाणे तपास पथक प्रमुख श्री. चेतन मोरे, पोलीस उपनिरीक्षक संतोष शिंदे व स्टाफ यांना मार्गदर्शन करून आरोपीचा शोध घेण्याबाबत सुचना दिल्या. लागलीच कोंढवा पोलीस ठाणे तपास पथकातील पोहवा राजस शेख यांचे गोपनिय बातमीदारांमार्फत यातील नमुद आरोपींचे ठाव ठिकाण्याबाबत माहिती प्राप्त होताच कोंढवा पोलीस ठाणेकडील सहा. पोलीस निरीक्षक चेतन मोरे, पोलीस उपनिरीक्षक संतोष शिंदे, पोहवा राजस शेख, पोना पृथ्वीराज पांडुळे, योगेश कुंभार, पोशि आदर्श चव्हाण व कोतवाली पोलीस ठाणेकडील पोलीस उपनिरीक्षक एस.व्ही.खामगळ व त्यांचेकडील स्टाफ असे कोंढवा परिसरामध्ये रवाना होवून मोठया शिताफीने आरोपीत नामे १. फैजान अब्दुल रौफ शेख वय-२६ वर्षे, रा. जुना बाजार, भिस्त गल्ली, अहमदनगर २. अशरफ अब्दुल रौफ वय-२४ वर्षे रा. सदर ३. अबीद कलीम शेख वय-२८ वर्षे, रा. जुना बाजार बंगाल चौकी अहमदनगर (संशयीत) पकडून दाखल गुन्हयाचे पुढील तपासकामी कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक एस.व्ही.खामगळ यांचे ताब्यात दिले आहेत.

सदरची कामगिरी श्री. अनिल पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. महादेव कुंभार पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक चेतन मोरे, पोलीस उपनिरीक्षक संतोष शिंदे, पोहवा राजस शेख, पोना पृथ्वीराज पांडुळे, योगेश कुंभार, पोशि आदर्श चव्हाण व कोतवाली पोलीस ठाणेकडील (अहमदनगर) पोलीस उपनिरीक्षक एस.व्ही.खामगळ व त्यांचेकडील स्टाफ यांनी केलेली आहे.

(अनिल पाटील)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोंढवा पोलीस ठाणे पुणे शहर